# SUCCESS KEY TEST SERIES

**IX- Marathi Medium**

**Worksheet-1 , Ch- 2A,AA,3**

मराठी-

DATE:

TIME: 1 hrs

MARKS: 25

SEAT NO:

**Q.1 A) खालील कृति करा.** **(8)**

1) **आकलन कृती** 2

1.




2. **पुढील शब्दांना प्रमाण भाषेतील शब्द सांगा.**

i. कठीया

ii. सी

डोमग्रामी गोसावीयांचा ठायी उदयाचे मातीकाम होत होते: ते सी बाजत होते: तेणे भक्तीजनासी व्यापार होववे ना: आन भट व्यापार् करू लागले: नथोबाए म्हणीतले: “नागदेया: तू कैसा काही हिंवसी ना?” तवं भटी म्हणीतले: आम्ही वैरागी: काइसीया हीवु:” यावरी सर्वज्ञ म्हणीतले: “वानरेया: पोरा जीवासी वैराग्य मिरवु आवडे: हाही एकू विकारूची की गा:” यावरि भटी म्हणीतले: “ जी जी: निर्वीकार तो कवण:” सर्वज्ञें म्हणीतले:” “वानरेया: पोर जीव वीकारावेगळा केव्हेळाली जालाचि नाही: मा तु काइ वेगळा असिसि:” “हो कां जी:” यावरि गोसावी कीर्ती कठीयाचा दृष्टान्त नीरोपीला: “कव्हणी ऐकू कठीया असे: तो भोगस्थानाची सुश्रुषा करी: झाडी: सडा संमार्जन करी: ते देखैनि गावीचे म्हणति: ‘ कठीये हो नीके करीत असा: बरवे करीत असा:’ ते आइकोनि दिसवाडीचा दिसवडी हात हात चढवी: तयासि देवता आपुले फळ नेदी: तयासि देवता आपुले फळ नेदी: तयासी किर्तिचेची फळ झाले:”

2) **आकलन कृती** 2




3) **1. अचूक शब्द ओळखा.** 2

i. लीळाचरित्र , लिळाचरित्र , लिळाचरित्र

ii. परिश्रमपूर्वक , परीश्रमपूर्वक , परिश्रमपुर्वक

**2. विभक्ती प्रत्यय व विभक्ती ओळखा.**

i. शाळेत - ______ → ______

ii. फुलांनी - ______ → ______

4) **स्वमत :-** 2

पाठातील दृष्टांन्त वेगळ्या उदाहरणद्वारे स्पष्ट करा.

**B) खालील कृति करा** **(10)**

1) **कृती करा.** 2

1) संत जनाबाई यांनी धरीला - ______

2) संत जनाबाई यांनी चोराच्या गळ्यात बांधला - ______

3) चोरासाठी याचा बंदिखाना केला - ______

4) संत जनाबाईनी बंदिखान्यात याला कोंडले - ______

धरिला पंढरीचा चोर ।

गळां बांधोनियां दोर ।।1।।

हृदय बंदिखाना केला।
आंत विठ्ठल कोंडिला ।।2।।

शब्दें केली जवाजुडी।
विठ्ठल पायीं घातली बेडी।।3।।

सोहं शब्दाचा मारा केला ।
विठ्ठल काकुलती आला ।।4।।

जनी म्हणे बा विठ्ठला ।
जीवें न सोडीं मी तुला ।।5।।

2) **खाली दिलेल्या शब्दांसाठी उपमा लिहा.** 2

i. विठ्ठल -

ii. हृदय -

3) **संदर्भ स्पष्टीकरण :-** 3

सोहं शब्दाचा मारा केला ।
विठ्ठल काकुलतीला आला ।। या ओळीतील विचार स्पष्ट करा.

4) **स्वमत :-** 3

मानवी जीवनातील भक्ती, श्रद्धा यावर तुमचे विचार मांडा.

**Q.2 Grammar**

**पुढील ओळींतील रस ओळखा :-** **(2)**

भारनियम खूप झालं त्याविषयी खूप लिहून, बोलून झाला आता थोडे (आ) भर नियमन काऱ्याला लागूया.